**महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी**
**मुख्य भांडार, बियाणे विभाग,** दुरध्वनी क्र.: ०२४२६-२४३०५१ ई-मेल: csseed.mpkv@yahoo.in

# जाहीर निवेदन

जाहीर निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, सन २०२२-२३ मध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ मध्यवर्ती परिसर, राहुरी, जि. अहमदनगर येथील बियाणे विभाग व इतर विभाग प्रक्षेत्रावरील ऊस गाळपासाठी उपलब्ध असल्याने, **अहमदनगर जिल्हयातील इच्छुक सहकारी साखर कारखान्यामार्फत लेटर ऑफ इंटरेस्ट** पध्दतीने सीलबंद लखोटयात दर मागविण्यात येत आहे.सदरील ऊसाच्या क्षेत्राबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| ऊसाचे वाण | एकूण गाळपासाठी उपलब्ध क्षेत्र | दर प्रति मे.टन |
|---|---|---|
| सुरु,खोडवा,उसाच्या जाती को.एम-२६५, को.एम-८६०३२,एम.एस.१०००१, को-९०५७, व्हि.एस.आय.-८००५, को-९२००५, को.एम-११०८२,पीडीएन-१५०१२ | **८८.१५ हेक्टर** | |

तरी **अहमदनगर जिल्हयातील इच्छुक सहकारी साखर कारखान्यांनी सीलबंद लखोटयात गाळपासाठी ऊसाचे दर कळवावेत.** दर खालील नियम व अटींच्या अधीन राहुन कळविण्यात यावेत. **दरपत्रकाचा सीलबंद लखोटा मा. प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे), बियाणे विभाग,म.फु.कृ.वि. राहुरी-४१३ ७२२ कार्यालयात दि. १४/११/२०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचेल अशा रीतीने पाठवावा.** उशिरा आलेल्या सीलबंद लखोटयातील दर विचारात घेतले जाणार नाही.

**ऊस विक्री व्यवहारच्या नियम व अटी**

१. ऊसाचा दर कळविताना संपुर्ण ऊसाचा वाढयासह (ऊस + वाढे) दर प्रती मे.टन प्रमाणे कळवावा. ऊसाची तोडणी, वाहतुक, वजन करणे इत्यादी खर्चाचा त्यात समावेश करु नये.तो खर्च साखर कारखान्याने करावयाचा आहे.

२. कामागाराच्या जिवीताची जबाबदारी ही कारखान्याची राहील. कामगारांचा **"कामगार नुकसान भरपाई कायदयानुसार "** भरपाई दयावयाचे बाबतचा विमा हा परस्पर उतरविणे ही जबाबदारी कारखान्याची राहील. कामगारांना काही नुकसान भरपाई देय झाल्यास ती पुर्णपणे कारखान्यांनी दयावयाची आहे. या बाबत कृषि विदयापीठास कोणत्याही प्रकारे तोशिष लागू होणार नाही. तसेच या बाबत काही आकस्मित आर्थिक नुकसान झाले तर विदयापीठ कारखान्याकडून सदरील नुकसान वसुल करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

३. ऊस तोडणी कामगारावर आपले नियंत्रण असेल त्यांना विद्यापीठाकडून कोणत्याही प्रकारे मोबदला दिला जाणार नाही.

**४. कारखान्याने ऊसाचे देयकाची अदायगी (पेमेंट) ऊस तोडणीच्या दिनांकापासून दोन महिन्यांचे आत करणे बंधनकारक राहील. ऊस देयकाची रक्कम दोन महिन्यांच्या आत सदर साखर कारखान्याने अदा केली नाही तर सदर रक्कमेवर १८ टक्के दरानुसार देयकाची अदायगी होईपर्यंत दंडात्मक व्याजासह रक्कम विद्यापीठास अदा करावी लागेल. उसाची रक्कम एकरकमी अदा करावी लागेल.**

५. गाळपासाठी दिलेल्या ऊसाच्या गाळपानंतर जर संबंधित कारखान्याकडून इतर सभासद शेतक-यांना विद्यापीठास दिलेल्या दरापेक्षा जास्त दर देण्यात आला तर जास्त देण्यात आलेल्या वाढीव दराप्रमाणे रक्कम विद्यापीठास अदा करावी लागेल.

६. देयकाची अदायगी (पेमेंट) मा. अधिदान व लेखा अधिकारी, म.फु.कृ.वि. राहुरी यांचे नावे धनादेशाव्दारे /आर टी जी एस /एन ई एफ टी व्दारे एक रकमी करावी लागेल.

७. प्रक्षेत्रावरील विजेचा अनाधिकृत वापर करता येणार नाही. तसा वापर करण्याचा प्रयत्न केल्यास कायदेशीर कार्यवाहीस कारखाना जबाबदार राहील.

८. गाळपासाठी तयार असलेल्या विद्यापीठाच्या मध्यवर्ती परीसरातील सर्व क्षेत्रावरील ऊसाची तोड करणे बंधनकारक राहील. अर्धवट क्षेत्राची तोडणी केल्यास किंवा तोडणी पूर्ण न झाल्यास कारखान्याकडून भरपाई वसूल केली जाईल.

**९. सदर ऊस दि. ३१/०३/२०२२ पुर्वी तोडुन नेणे कारखान्यास बंधनकारक राहिल.विद्यापीठाचा ऊस प्रथम प्राधान्याने तोडुन न्यावा लागेल.**

१०. इच्छुक कारखानदारांसाठी ऊस प्रक्षेत्र कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

११. ऊस तोडणी दरम्यान विद्यापीठ मालमत्तेच नुकसान होणार नाही, याची काळजी/जबाबदारी कारखान्याची राहील.

१२. निविदा मंजुर झालेनंतर निविदाधारकाने वरील सर्व अटी मान्य असलेबाबतचा करारनामा रु.५०० च्या बॉन्डपेपरवर सादर करावा.

**अध्यक्ष**
विक्री समिती तथा संशोधन संचालक,
म.फु. कृ.वि. राहुरी